- प्रेस नोट -

दि. ०२/११/२०२६

पवई पोलीस ठाणे - खुनाचा प्रयत्न

दि.३१/१०/२०२६ रोजी १९.३० वा. ते १९.४५ वा. च्या दरम्यान महिला फिर्यादी, वय-६० वर्षे, धंदा- घरकाम, रा.ठी. फिल्टरपाडा, आरे रोड, पवई, मुंबई यांचे राहते घरी फिर्यादींचा जावई अटक आरोपी पुरूष वय- ३१ वर्षे याने नशा करण्यासाठी फिर्यादींची मुलगी व फिर्यादींकडे पैसे मागितले असता त्यांनी पैसे देण्यास नकार दिला असता अटक आरोपीताने घरातील चाकु उचलुन फिर्यादींना वा त्यांच्या मुलीला शिवीगाळ करून जीवे मारण्याच्या उद्देशाने चाकुने वार करून जखमी केले म्हणुन फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरुन दि.०१/११/२०२६ रोजी गु.र.क्र. ११२५/२६, कलम १०९(१),३५१(२) बीएनएस २०२३ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.
